12 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया’वर व्याख्यानमाला

## विद्यापीठात उद्यापासून आयोजन : शारदाबाई पवार अध्यासनाचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे सोमवार (दि. १३) ते शनिवार (दि. १८) दरम्यान 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानमाला होणार आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, विद्यापीठाचा हिरक महोत्सव आणि शारदाबाई पवार यांच्या जयंतीनिमित्त ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे.

या व्याख्यानमालेचे उद्घाटन सोमवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. त्यादिवशी प्रसाद कुलकर्णी (विषय : इंदुताई पाटणकर) यांचे व्याख्यान होईल. त्यानंतर मंगळवारी प्रा. पद्मजा पाटील (राजमती पाटील-बिरनाळे), बुधवारी प्रा. माया पंडित (कॅप्टन लक्ष्मी सेहगल), गुरूवारी डॉ. अशोक चौसाळकर (प्रा. उषा मेहता), शुक्रवारी डॉ. नंदा पारेकर (ॲन मारी पीटरसन, इस्तर फाअरिंग, एलन होरूप), प्रा. छाया पवार (जयाबाई हाविरे आणि भागिरथी तांबट) यांचे व्याख्यान होणार आहे. रोज सकाळी साडेअकरा वाजता व्याख्यानाची सुरूवात गुगल मीट लिंकवर (https://meet.google.com/oka-orfy-xvo) होईल, अशी माहिती प्रा. भारती पाटील यांनी दिली.

लोकसत्ता

# प्रा. वसंत पाटणकर यांना पुरस्कार



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक, कवी, प्रा. वसंत पाटणकर यांना जाहीर झाला आहे. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरूप असून तो २९ जानेवारी रोजी ज्येष्ठ विचारवंत डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते विद्यापीठात देण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली. नामवंत समीक्षक, अनुवादक आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. म. सु. पाटील यांच्या कार्याची स्मृती म्हणून हा पुरस्कार प्रति दोन वर्षांनी पाटील कुटुंबीयांच्या वतीने देण्यात आलेल्या देणगीतून दिला जातो. मराठी समीक्षा लेखनातील भरीव योगदान असलेले प्रा. पाटणकर मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले आहेत. 'विजनातील कविता' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. 'कविता : संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा' व 'कवितेचा शोध' या ग्रंथातील त्यांची समीक्षा मौलिक ठरली आहे. कविता या साहित्यप्रकाराविषयीची आस्था, जिव्हाळा आणि आधुनिक मराठी काव्याची मर्मदृष्टी त्यांच्या लेखनात आढळून येते.

12 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बापूजी साळुंखे यांच्या संस्काराचा गौरव

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे गौरवोद्‌गार; डॉ. आर. आर. कुंभार यांचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाचा लाभ व्हावा म्हणून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांना मिळालेला शिवाजी विद्यापीठाचा 'गुणवंत प्राचार्य पुरस्कार २०२१' हा बापूजींच्या विचारकार्याचा व संस्काराचा गौरव आहे, असे गौरवोद्‌गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी काढले.




कोल्हापूर : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत अन्य मान्यवर.

यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या आयक्यूएसीच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना पद्म पुरस्कार मिळावा म्हणून केंद्र शासनाकडे पाठवण्यासाठी संकलित केलेली पत्रे प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचेकडे सुपूर्द करण्यात आली.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. अशोक पाटील यांनी केले, तर प्रा. डॉ. प्रदीप पाटील लिखित मानपत्राचे वाचन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले.

12 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विभागीय कुस्ती स्पर्धेत मंडलिक महाविद्यालयास विजेतेपद

**मुरगूड : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय कुस्ती स्पर्धेत मुरगूडच्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या मल्लांनी ११ गुण मिळवित ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात विजेतेपद पटकावले.

कुस्ती स्पर्धेतील यशस्वी मल्ल असे : ग्रीको रोमन- विजय डोईफोडे (७७ किलो प्रथम), रोहित पाटोळे (५५ किलो द्वितीय), मयूर सोनाले (८७ किलो द्वितीय). फ्री स्टाईल- विनायक वास्कर (७० किलो तृतीय), ओंकार काशीद (७९ किलो तृतीय).



**मुरगूड : विजेतेपद पटकावलेल्या मल्लांसमवेत डॉ. टी. एम. पाटील, डॉ. शिवाजी पोवार, दिलीप कांबळे.**

या सर्व मल्लांची निवड आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी झाली आहे. त्यांना डॉ. शिवाजी पोवार यांचे मार्गदर्शन लाभले. सचिव खा. प्रा. संजय मंडलिक, मंडलिक साखरचे संचालक ॲड. वीरेंद्र मंडलिक, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांचे प्रोत्साहन मिळाले.

या मल्लांचा सत्कार उपप्राचार्य डॉ. टी. एम. पाटील यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शिवाजी पोवार, दिलीप कांबळे, सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

तरुण भारत

# आंतरविभागीय महिला बॅडमिंटन स्पर्धेत महावीर महाविद्यालय अजिंक्य



ऋचा आळवेकर



प्रेरणा आळवेकर

- अंतिम लढतीत सातारा संघाचा केला पराभव
- सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपदाला गवसणी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत अंतर विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत महावीर महाविद्यालयाच्या मुलींनी लालबहाद्दूर शास्त्री महाविद्यालय, सातारा या संघाचा एकतर्फी पराभव करून सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद पटकांवले. राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इस्लामपूर यांच्या संयोजनाखाली पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये महावीर महाविद्यालयाच्या ऋचा आळवेकर व प्रेरणा आळवेकर या दोघी भगिनींनी आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना एकतर्फी हरवत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी या दोघींची शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघामध्ये निवड झाली आहे. सदर खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रोहित पाटील, प्रा. डॉ. बाबासो उलपे यांचे मार्गदर्शन तर संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे व प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांचे प्रोत्साहन लाभले.

12 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माने महाविद्यालय अजिंक्य, न्यू कॉलेज उपविजेता

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिल फुटबॉल स्पर्धा : कमला कॉलेज तिसऱ्या स्थानी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयाने कोल्हापुरातील न्यू कॉलेजला टायब्रेकरमध्ये ४–३ गोलफरकाने पराभूत करुन शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. वारणानगरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा झाली.

चव्हाण महाविद्यालयाने स्पर्धेचे संयोजन केले होते. स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात माने महाविद्यालयाने चव्हाण महाविद्यालयास ५–० गोलने हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. तसेच दुसऱ्या सामन्यात न्यू कॉलेजने कमला कॉलेजला ३–० गोलने जिंकून अंतिम फेरीत उडी घेतली. यानंतर माने महाविद्यालय व न्यू कॉलेज यांच्यात अंतिम सामना झाला. पुर्णवेळेत सामना १–१ गोलबरोबरीत सुटल्याने टायब्रेकरचा अवलंब केला. यात माने महाविद्यालयाने बाजी मारत न्यू कॉलेजचा ४–३ गोलफरकाने पराभव करुन स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. तिसऱ्या क्रमांकासाठी कमला कॉलेज व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय यांच्यात सामना झाला. हा सामना पूर्णवेळेत गोलशुन्यबरोबरीत सुटल्याने टायब्रेकरचा अवलंब केला. यात कमला कॉलेजने चव्हाण महाविद्यालयाचा ४–२ अशा गोलफरकाने पराभव करुन स्पर्धेचा तिसरा क्रमांक पटकावला.

बक्षीस वितरण समारंभात स्पर्धा विजेत्या माने महाविद्यालयास विद्यापीठ फुटबॉल संघ निवड समितीचे चेअरमन डॉ. दीपक डांगे-पाटील यांच्या हस्ते चषक देऊन गौरवण्यात आले. यावेळी वारणा महाविद्यालयाचे प्रा. अण्णासाहेब पाटील, प्रा. गणेश सिंहासने, प्रा. अमर सासने, माने महाविद्यालयाचे प्रा. श्रीनिवास पाटील आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावलेल्या. डी. आर. माने महाविद्यालयाच्या संघासोबत प्राचार्य डॉ. प्रवीण चौगुले, भैय्या माने व प्रा. श्रीनिवास पाटील.**

### विजेता माने महाविद्यालयातील खेळाडूंची नावे अशी

तेजस्विनी कोळसे, जुलेखा बिजली, अर्पिता पोवार, सोनाली सुतार, निशा पाटील, शाहिन शेख, सानिका चौगले, ऋतुजा पाटील, रविना नरेवाडी, सुप्रिया येरनाळे, सारिका पाटील, पूजा कुंभार, निलम पाटील व अंजली कांबळे.